Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# महाराष्ट्रातील आदिवासी जमाती: भौगोलिक विश्लेषण

**डॉ.अशोक शहाजी भालेराव**
भूगोल विभाग प्रमुख
चिस्तिया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
खुलताबाद. जि. औरंगाबाद

**प्रस्तावना:**

आदिवासी जमाती या भारतातील मूळ रहिवासी आहेत. देशात आदिकाळापासून वास्तव्य करणारा हा समूह आहे. आदिवासी निसर्ग पूजक आहेत. पर्वत,पशुपक्षी, नद्या, जंगल हीच त्यांची दैवते. त्यांची भाषा, संस्कृती, देव आणि चालीरीती निसर्गाशी निगडित आहेत. भारतीय राज्यघटनेमध्ये संविधानाने अशा आदिवासी समाजाचा समावेश आदिवासी जमातीमध्ये केलेला आहे. इ. स.1962 साली शिलांगमध्ये आदिवासी परिषद झाली, त्या परिषदेमध्ये आदिवासी समाजाची व्याख्या केली, ती अशी एका समान भाषेचा वापर करणारे, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणारे, एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणारे, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेले, अक्षर ओळख नसलेले आणि रक्त संबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रितीरिवाजानुसार प्रामाणिक पालन करणाऱ्या एकजीनसी गटाला आदिवासी समाज म्हणतात.नागर संस्कृती पासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मूळ रहिवासी म्हणजे आदिवासी असे सामान्यपणे म्हणता येईल.

आदिम संस्कृतीचा दर्शक म्हणजे आदिवासी. या समाजाचा संपर्क नागरी समाजाशी न आल्यामुळे या जमातीमध्ये हजारो वर्षांपासून विशेष असे परिवर्तन झालेले नाही आदिवासी जमाती या देशाच्या तशाच राहिल्या,त्यामुळे आधुनिक काळात ही हा समाज विकासापासून कोसो दूर आहे. आदिवासी जमाती भारतीय समाजाचा अविभाज्य भाग आहे. त्यांना भारतीय समाजामध्ये समाविष्ट करणे,सामावून घेणे सामाजिक विकासाची फळे त्यांच्यापर्यंत पोहोचविणे राष्ट्रहिताच्या दृष्टीने अगत्याचे आहे. याच हेतूने सदरील लेखांमध्ये महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये 45 आदिवासी जमातींना अनुसूचित जमाती म्हणून भारत सरकारने मान्यता दिलेली आहे.राज्यात भिल्ल, महादेव कोळी, ढोर कोळी, टोकरे कोळी, पावरा, ठाकूर,वारली, अंध,कोकणा, कोकणी या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. राज्यामध्ये तीन आदिवासी जमातींना भारत सरकारने आदीम जमाती म्हणून अधिसूचित केलेले आहे. यामध्ये १) कोलाम यवतमाळ जिल्हा, २) कातकरी ठाणे व रायगड जिल्हा ३) माडिया गोंड गडचिरोली जिल्ह्या. या तीन जमातींना केंद्र शासनाने आदिम जमाती Primitive Tribes म्हणून अधिसूचित केलेले आहे. अति मागास जमाती म्हणून अधिसूचित केलेले आहे.कातकरी जमात मूळ कोकणातील, पुढे ते ठाणे, पुणे, नाशिक, रायगड व सिंधुदुर्ग भागामध्ये स्थलांतरित झाले. कोलाम जमात ही विदर्भातील. चंद्रपूर, वर्धा व यवतमाळ या भागातील आहे. माडिया गोंड, ही गोंडाची उपजमात किंवा संबंधित जमात आहे.माडिया गोंड, गडचिरोली, भामरागड भागातील आहे. या वरील तीन जमाती अति मागास आहेत.याची कारणे म्हणजे या जमातींना स्वतःची शेती नाही. यांना स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी खात्रीशीर स्रोत नाहीत.गरजेनुसार व उपलब्धतेनुसार व्यावसाय करून उपजीविका करतात. या जमाती नियमित स्थलांतर करतात.उदरनिर्वाहासाठी शेतमजुरी भटके जीवन पद्धती स्वीकारलेली आहे. या जमातीमध्ये अज्ञान अंधश्रद्धा अतिशय टोकाचे आहे.या जमातीच्या समस्या इतर जमातींपेक्षा अतिशय गंभीर स्वरूपाच्या आहेत. कातकरी जमातीत 84% निरक्षरता कोलाम 63% निरक्षरता, माडिया गोंड जमातीत 67% निरक्षरता आढळून येते.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

1) महाराष्ट्र राज्यातील आदिवासी जमातींचा अभ्यास करणे.
2) महाराष्ट्र राज्यातील आदिवासी जमाती जिल्हानिहाय वर्गीकरण व वितरणाचा अभ्यास करणे.

**अभ्यास पद्धती:**

महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचा अभ्यास करण्यासाठी दुय्यम स्वरूपाच्या आकडेवारीचा उपयोग करण्यात आलेला आहे. भारत तसेच महाराष्ट्र राज्य आदिवासी विभाग यांच्या संकेतस्थळावरून प्रकाशित आकडेवारी आधारे अभ्यास करण्यात आलेला आहे. योग्य तेथे नकाशे,आलेख व योग्य तेथे सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे.

**भारतातील आदिवासी जमाती:**

देशात 1991 च्या जनगणनेनुसार आदिवासी जमातींची लोकसंख्या 9,91,11,498 एवढी होती.2001 मध्ये 12,43,26,440 होती. देशाच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात 8.2% आदिवासी जमातीचे प्रमाण होते. ते 2011 च्या जनगणनेनुसार देशात एकूण लोकसंख्येच्या 8.6% लोकसंख्या आदिवासी जमातीची लोकसंख्या आहे. अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम आणि नागालँड या ईशान्येकडील राज्यांमध्ये एकूण लोकसंख्येच्या 90% पेक्षा जास्त लोकसंख्या

आदिवासी जमातीची आहे. आसाम, मणिपूर, सिक्कीम, त्रिपुरा या राज्यात देखील आदिवासी जमाती लोकसंख्येचे प्रमाण 30 टक्क्यापर्यंत आढळते. आदिवासी जमातींची सर्वात जास्त लोकसंख्या पूर्वीकडील गुजरात आणि पश्चिमेकडील राजस्थान पासून पश्चिम बंगाल पर्यंत पसरलेल्या पट्ट्यात आढळते. हा पट्टा आदिवासी पट्टा म्हणून ओळखला जातो. भौगोलिक दृष्ट्या देशात चार प्रमुख क्षेत्रामध्ये आदिवासी जमातीचे विभाजन झालेले आढळते, 1) उत्तर पूर्वी क्षेत्र 2) मध्य क्षेत्र 3) पश्चिम क्षेत्र 4) दक्षिणक्षेत्र.

**महाराष्ट्र: आदिवासी जमाती**

महाराष्ट्र राज्यामध्ये 1971 च्या जनगणनेनुसार 5,04,12,235 या एकूण लोकसंख्येपैकी 29,54,249 एवढी आदिवासी जमातीची लोकसंख्या होती. ही राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात 5.86% एवढी होती. तर 2011 च्या जनगणनेनुसार राज्यांमध्ये आदिवासी लोकसंख्या 1,05,10,213 एवढी असून राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात 9.35% एवढी आढळून येते. राज्यामध्ये 45 आदिवासी जमातींना अनुसूचित जमाती म्हणून भारत सरकारने मान्यता दिलेली आहे.त्यामध्ये भिल्ल, गोंड,महादेव कोळी, वारली, कोकणा आणि ठाकूर यांची एकत्रित संख्या राज्यातील एकूण आदिवासींच्या प्रमाणात ७३.३ टक्के एवढी येते. त्यापैकी भिल्ल या जमातीची लोकसंख्या सर्वात जास्त म्हणजेच 24.63%, गोंड 18.1%, महादेव कोळी 14.3%, वारली 7.3%, कोकणा 6.7%, ठाकूर 5.7% अशी वरील जमातींची विभागणी आढळते. राज्यामध्ये एकोणावीस जमाती आशा आहेत की त्यांची संख्या 1000 पेक्षाही कमी आढळून येते. राज्यात तीन जमातींना आदिम जमाती Primitive Tribes म्हणून भारत सरकारने जाहीर केलेले आहे. १)कोलम - यवतमाळ जिल्हा, कातकरी - ठाणे आणि रायगड जिल्हा, माडिया गोंड - गडचिरोली जिल्हा.

महाराष्ट्रात ज्या भागात आदिवासी राहतात त्या भागाचे भौगोलिक दृष्ट्या तीन विभाग पडतात.

**सह्याद्री विभाग:**

या विभागामध्ये नाशिक, रत्नागिरी, रायगड, ठाणे,अहमदनगर, पुणे इत्यादी जिल्हे येतात. या विभागांमध्ये मल्हार कोळी, ढोर कोळी, महादेव कोळी, वारली, कोकणा, कातकरी ठाकूर, दुबळा, धोडिया इत्यादी जमाती प्रामुख्याने आढळतात.

**सातपुडा विभाग:**

या विभागामध्ये धुळे, नंदुरबार, जळगाव, अमरावती व नांदेड हे जिल्हे येतात. या विभागामध्ये कोकणा, पावरा, गामीत, भिल्ल, कोरकू, धानका, पारधी, नायकडा, राठवा या जमाती आहेत.


**गोंडवाना विभाग:**

या विभागात चंद्रपूर, यवतमाळ, गडचिरोली, भंडारा,गोंदिया,नागपूर या जिल्ह्यांचा समावेश होतो. या विभागामध्ये गोंड, आंध,कोलम, कोलाम, परधान, हळबा, हळबी, कावरू, थोटी,थोट्या, कोरकू, माडिया, राजगोंड या जमाती वास्तव्यास आढळतात.

तक्ता क्र. १ - **महाराष्ट्र एकूण लोकसंख्या प्रमाणात आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण (1971 ते 2011)**

| अ. क्र. | वर्ष | एकूण लोकसंख्या (लक्ष) | आदिवासीं एकूण लोकसंख्या (लक्ष) | राज्यातील लोकसंख्येशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1 | 1971 | 504.12 | 38.41 | 7.62% |
| 2 | 1981 | 627.84 | 57.72 | 9.19% |
| 3 | 1991 | 789.37 | 73.18 | 9.27% |
| 4 | 2001 | 968.79 | 85.77 | 8.85% |
| 5 | 2011 | 1123.74 | 105.10 | 9.35% |

वर्ष 1971 ते वर्ष 2011 पर्यंत महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या आणि आदिवासींची एकूण लोकसंख्या यांचं सविस्तर वितरण वरील तक्त्यामध्ये दाखविण्यात आलेले आहे. त्यानुसार 1971 मध्ये महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ५०४.१२ लक्ष एवढी होती.तर आदिवासींची एकूण लोकसंख्या 38.41 अशी होती. ती महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये ७.६२ टक्के या प्रमाणात होती. वर्ष 1981 मध्ये आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या प्रमाणाशी 9.19% असे होते.1991 मध्ये आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण 9.27% होते. मात्र 2001 यावर्षी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण 8.85% झाले. ते 1991 या वर्षाच्या तुलनेत कमी होते. तर वर्ष 2011 या वर्षी महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या 1123.74 लक्ष होती.तर आदिवासींची एकूण लोकसंख्या 105.10 लक्ष अशी होती. महाराष्ट्राच्या तुलनेमध्ये आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण 9.35% आढळून येते.




तक्ता क्र. २ - **महाराष्ट्रातील आदिवासी जमाती लोकसंख्या निहाय वर्गीकरण (2011)**

| अ.क्र. | आदिवासी जमात नाव | महाराष्ट्रातील आदिवासी एकूण लोकसंख्या | आदिवासी जमातीशी प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| 1 | भिल्ल | 25,88,659 | 24.63 |
| 2 | गोंड | 16,18,090 | 15.39 |
| 3 | डोंगर कोळी,महादेव कोळी | 14,59,565 | 13.88 |
| 4 | वारली | 7,96,245 | 7.57 |
| 5 | कोकणा,कोकणी | 6,87,431 | 6.54 |
| 6 | आंध | 4,74,110 | 4.51 |
| 7 | काथोडी,कातकरी | 2,85,334 | 2.71 |
| 8 | कोळी मल्हार | 2,82868 | 2.69 |
| 9 | कारकू, भोपची | 2,64,492 | 2.51 |
| 10 | हलबा,हलबी | 2,61,011 | 2.48 |
| 11 | पारधी,अडविचिंचर | 2,23,527 | 2.12 |
| 12 | कोळी ढोर टोकरे कोळी | 2,20,074 | 2.9 |
| 13 | कोलम मन्नेरवारलू | 1,94,671 | 1.85 |
| 14 | परधान, पथारी, सरोटी | 1,45,131 | 1.38 |
| 15 | गामित,गामटा,गावित, | 67,796 | 0.64 |
| 16 | कवर,कंवर,कौर | 26,354 | 0.25 |

| अ.क्र. | आदिवासी जमात नाव | महाराष्ट्रातील आदिवासी एकूण लोकसंख्या | आदिवासी जमातीशी प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| 17 | धनका,तडवी,तेतारिया | 35,104 | 0.33 |
| 18 | दुबळा,तेवढ्या,हलपती | 18,697 | 0.17 |
| 19 | ओराओन, ढांगाप | 43,060 | 0.40 |
| 20 | नाईकडा,नायका | 22,307 | 0.21 |
| 21 | धोडीया | 17,520 | 0.16 |
| 22 | बिंजावर,बिजवर | 8,567 | 0.08 |
| 23 | भुजिया | 2,136 | 0.02 |
| 24 | कोल | 6,874 | 0.06 |
| 25 | पाटेलिया | 2,574 | |
| 26 | खैरवार | 1843 | 0.017 |
| 27 | कमर | 1391 | 0.013 |
| 28 | भुरिया,भुमिया | 1348 | 0.012 |
| 29 | बाददा | 1247 | 0.011 |
| 30 | धनवार | 4094 | 0.03 |
| 31 | खारिया | 745 | 0.007 |
| 32 | कोंद,खोंद | 515 | 0.004 |
| 33 | राथवा | 488 | 0.004 |
| 34 | सावरा,सावर | 348 | 0.0003 |
| 35 | पारजा | 315 | 0.002 |
| 36 | कोया | 388 | 0.03 |
| 37 | बैगा | 333 | 0.003 |
| 38 | बावचा,बमचा | 345 | 0.003 |
| 39 | भैना | 270 | 0.002 |
| 40 | बिर्होर, बिहुल | 145 | 0.001 |
| 41 | नागेसिया, नागासिया | 133 | 0.001 |
| 42 | भत्रा | 66 | 0.0006 |
| 43 | पोमला | 44 | 0.0004 |
| 44 | ठाकूर, ठाकर | 56.7968 | 5.40 |
| 45 | विठोलिया, काठवालिया | 448 | 0.004 |

**महाराष्ट्र आदिवासी जमातनिहाय लोकसंख्या वर्गीकरण (2011)**

महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण आदिवासी जमातींची लोकसंख्या जनगणना 2011 नुसार 1,05,10,000 एवढी असून राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात 9.35% आहे. भिल्ल, गोंड, डोंगर कोळी, महादेव कोळी, कोकणा, वारली, ठाकर, कातकरी,आंध या आदिवासी जमातींचे प्रमाण अधिक आढळते.

राज्यामध्ये एकूण 45 आदिवासी जमातींना भारत सरकारची मान्यता आहे. राज्यातील आदिवासी जमात निहाय वर्गीकरण अभ्यासल्यास असे दिसते की,भिल्ल या जमातीची संख्या 25 लक्ष 88 हजार 659 एवढी आहे.आदिवासी जमातीमध्ये भिल्ल जमातीची संख्या सर्वाधिक आढळते.ती एकूण आदिवासी जमात लोकसंख्येच्या 24.63% एवढ्या प्रमाणात असून राज्याच्या 2.30% प्रमाणात आहे. गोंड जमातीचे प्रमाण आदिवासी जमातीच्या तुलनेत 15.39% असून राज्याच्या 1.43% आहे. महादेव कोळी- डोंगर कोळी जमातींची लोकसंख्या 14,59,565 असून एकूण जमातीच्या तुलनेत 13.88% आहे.कोकणी जमातीची लोकसंख्या 6,87,431 एवढी असून तिचे जमातीतील प्रमाण 6.54% आढळते. वारली जमातीची लोकसंख्या 7 लक्ष 96 हजार 245 आहे तिचे जमातीतील प्रमाण 7.57% एवढे आहे. परधान /पथारी /सरोटी/ मन्नेरवारलू/ कोलाम, टोकरी कोळी/कोळी ढोर /पारधी अडविचिंचर, हलबा/हलबी, कारकू/भोपची, कोळी मल्हार, कातकरी/ काथोडी, आंध, ठाकूर/ठाकर या जमातींची लोकसंख्या एक लाखाच्या वर आहे तर बिर्होर/बिहुल,भैना, पारजा, बैगा, बावच्या,/बमच्या, कोया,सावरा/ सावर, राथवा, खारिया, कोंद/ खोंद या आदिवासी जमातींची संख्या राज्यात अतिशय अल्प आहे. अगदी नगण्य स्वरूपाची आहे.म्हणजेच 500 च्या आत मध्ये आहे. धोडिया बिजावर/ बिजवर,कोल, भुजिया, धनवार,कमर, भुरिया/ भूमिया, खैरवार, बाददा या आदिवासी जमातींची लोकसंख्या राज्यात 1000 ते 10,000 हजारच्या दरम्यान आढळते.

तक्ता क्र. ३ - **महाराष्ट्र राज्य जिल्हा निहाय आदिवासी जमाती लोकसंख्येचे प्रमाण (2011)**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | एकूण लोकसंख्या (आकडे हजार मध्ये) | आदिवासी लोकसंख्या (आकडे हजार मध्ये) | एकूण लोकसंख्येबरोबर प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | नंदुरबार | १६४८ | ११४२ | ६९.२९ |
| २ | गडचिरोली | १०७३ | ४१५ | ३८.६७ |
| ३ | पालघर | २९९० | १११८ | ३७.३९ |
| ४ | धुळे | २०५१ | ६४७ | ३१.५४ |
| ५ | नाशिक | ६१०७ | १५६४ | ३६.६० |
| ६ | यवतमाळ | २७७२ | ५१४ | १८.५४ |
| ७ | चंद्रपूर | २२०४ | ३८९ | १७.६४ |
| ८ | गोंदिया | १३२३ | २१४ | १६.१७ |
| ९ | अमरावती | २८२९ | ४०४ | १३.९८ |
| १० | जळगाव | ४२३० | ६०४ | १४.२७ |
| ११ | रायगड | २६३४ | ३०५ | ११.५७ |
| १२ | वर्धा | १३०१ | १५० | १२.५२ |
| १३ | हिंगोली | ११७७ | ११२ | ९.५२ |
| १४ | नागपूर | ४६५४ | ४३८ | ९.४१ |
| १५ | नांदेड | ३३६१ | २८२ | ८.३९ |
| १६ | अहमदनगर | ४५४३ | ३७८ | ८.३२ |
| १७ | भंडारा | १२०० | ८९ | ७.४१ |
| २८ | वासिम | ११९७ | ८१ | ६.७६ |
| १९ | अकोला | १८१४ | १०० | ५.५१ |
| २० | ठाणे | ८०७० | ४२५ | ५.२६ |
| २१ | बुलढाणा | २५८६ | १२५ | ४.८३ |
| २२ | पुणे | ९४२९ | ३४९ | ३.७० |
| २३ | औरंगाबाद | ३७०१ | १४३ | ३.८६ |
| २४ | लातूर | २४५४ | ५७ | २.३२ |
| २५ | उस्मानाबाद | १६५८ | ३६ | २.१७ |
| २६ | परभणी | १८३६ | ४२ | २.२३ |
| २७ | जालना | १९६० | ४२ | २.१४ |

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | एकूण लोकसंख्या (आकडे हजार मध्ये) | आदिवासी लोकसंख्या (आकडे हजार मध्ये) | एकूण लोकसंख्येबरोबर प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २८ | सोलापूर | ४३१८ | १८ | १.८० |
| २९ | रत्नागिरी | १६१५ | २० | १.२५ |
| ३० | बीड | २५८५ | ३३ | १.२७ |
| ३१ | मुंबई उपनगर | ९३५७ | १०५ | १.१३ |
| ३२ | मुंबई शहर | ३०८५ | २५ | ०.८० |
| ३३ | सिंधुदुर्ग | ८५० | ०७ | ०.८२ |
| ३४ | सातारा | ३००४ | ३० | ०.९९ |
| ३५ | कोल्हापूर | ३८७६ | ३० | ०.७७ |
| ३६ | सांगली | २८२२ | १८ | ०.६३ |

**महाराष्ट्र राज्य जिल्हा निहाय आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण**

राज्यामध्ये नंदुरबार जिल्ह्यामध्ये जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी जमातीचे प्रमाण 69.29% आढळते. याचा अर्थ राज्यात सर्वाधिक आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण असणारा जिल्हा नंदुरबार जिल्हा आहे. यानंतर गडचिरोली जिल्ह्याचा नंबर येतो या जिल्ह्यात जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येच्या 38.67% प्रमाण आदिवासींचे आहे. पालघर जिल्ह्यामध्ये आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण 37.39% आहे.धुळे जिल्ह्यामध्ये 31.54% आदिवासी जमातीचे प्रमाण आहे.यवतमाळ जिल्ह्यामध्ये 18.54% असे आहे. नंदुरबार, गडचिरोली, पालघर, धुळे, नाशिक यवतमाळ, चंद्रपूर, नाशिक, गोंदिया, अमरावती, जळगाव या जिल्ह्यांमध्ये आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण अधिक्याने आढळते. सांगली, कोल्हापूर, सातारा, मुंबई शहर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये आदिवासी जमातींची लोकसंख्या अत्यल्प आढळून येते.

**निष्कर्ष:**

महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचा भौगोलिक अभ्यास या संशोधन लेखाच्या अभ्यासावरून खालील निष्कर्ष आहेत.

- महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या 11,23,74,374 (जनगणना वर्ष 2011) एवढी आहे.
- महाराष्ट्र राज्यात एकूण 45 आदिवासी जमातींना भारत सरकारने मान्यता दिलेली आहे.
- राज्यात सर्व आदिवासी जमातींची एकूण लोकसंख्या 1,05,10,000 एवढी आहे, ती राज्याच्या तुलनेत 9.35% आहे.
- डोंगर कोळी, महादेव कोळी कोकणा, वारली,ठाकर,आंध, कातकरी या आदिवासी जमातींची संख्या सर्वाधिक आहे.
- राज्यात भिल्ल या आदिवासी जमातीची लोकसंख्या राज्यात सर्वाधिक असून 25,88,659 एवढी आहे.तिचे एकूण आदिवासी जमातीतील प्रमाण 24.63% एवढे आहे.
- गोंड जमातीचे आदिवासी जमातीतील प्रमाण 15.39% आहे.
- बिर्होर /बिहुल,भैना, पारजा,बैगा ,बावचा/बमचा, कोया सावरा/सावर,राथवा, खारिया, कोंद/खोंद या आदिवासी जमातींची संख्या राज्यात अतिशय अल्प स्वरूपाची आहे.
- बिर्होर /बिहुल या आदिवासी जमातीची लोकसंख्या फक्त 145 एवढी आढळते. भैना 270 एवढी आहे.
- भत्रा या आदिवासी जमातीची लोकसंख्या 66, तर पोमला या जमातीची लोकसंख्या 44 एवढी अतिशय अल्प आढळते.
- राज्यात 1) कोलम (यवतमाळ जिल्हा) 2) कातकरी (ठाणे व रायगड जिल्हा) 3) माडिया गोंड (गडचिरोली जिल्हा) या तीन जमातींना आदिम जमाती म्हणून Primitive Tribes म्हणून भारत सरकारने जाहीर केलेले आहे.

**संदर्भ:**

1) मराठी विश्वकोश - खंड 2
2) आदिवासी समाज कोरकू बोली: वर्णनात्मक आणि समाजभाषा वैज्ञानिक अभ्यास: डॉ. काशिनाथ बऱ्हाटे, देवयानी प्रकाशन, मुंबई.
3) आदिवासी समाजाचे समाजशास्त्र: रा. ज. लोटे - पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.
4) महाराष्ट्राचा भूगोल: दीपक बाविस्कर, दिलीप पाटील, दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव.
5) भारताचा भूगोल: डॉ.विठ्ठल घारपुरे, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.
6) आदिवासी मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, संकेतस्थळावरून.
7) Tribal Research and Training Institute, Government of Maharashtra.
8) Tribal Development Department of Maharashtra.